ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२४ • बुधवार दि.३ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# हॉटेलमध्ये अग्नितांडव;२१ जणांचा होरपळून मृत्यू

## पंतप्रधानांकडून आपतग्रस्तांना मदत;मृतांमध्ये परदेशी नागरिकांचा समावेश



नवी दिल्ली: दक्षिण दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील 'लेमन ग्रीन' रेस्टॉरंटमध्ये लागलेल्या भीषण आगीत तब्बल २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मध्य आशिया व आफ्रिकेतील काही परदेशी नागरिकांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

देशाची राजधानी दिल्ली दक्षिण भागात असलेल्या मालवीय नगर येथील सहा मजली इमारतीत असलेल्या या रेस्टॉरंटमध्ये सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आग लागली. काही मिनिटांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण इमारतीला वेढा घातला. धूर आणि ज्वाळांनी इमारत व्यापल्याने आत अडकलेल्या नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला. जीव वाचवण्यासाठी अनेकांनी खिडक्या आणि बाल्कनीकडे धाव घेतली, तर काहींनी थेट इमारतीवरून उड्या मारल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, तातडीने सक्रिय करण्यात आली. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

**मृतांच्या वारसांना मदत-पंतप्रधानांची घोषणा**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत त्यांनी जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली. तसेच मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून देण्यात येणार असल्याची घोषणा केली.

# पश्चिम बंगालमध्ये ६० आमदारांच्या हाती बंडाचा झेंडा

## महाराष्ट्र पॅटर्नची चर्चा

कोलकाता: पश्चिम बंगालमध्ये डाव्यांचा गड उधळून पंधरा वर्ष सत्ता उपभोगलेल्या आणि आता प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या ८० पैकी ६० आमदारांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे.

महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर आता पश्चिम बंगालच्या राजकारणातही शिंदे पॅटर्नची चर्चा रंगू लागली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेस (टीएमसी) मध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आले असून, पक्षातील तब्बल ६० आमदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वासमोर नवे राजकीय आव्हान निर्माण झाले आहे.

विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीच्या मुद्द्यावरून हा वाद सुरू झाल्याचे सांगितले जात आहे. खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी सोभनदेव चट्टोपाध्याय यांची विरोधी पक्षनेतेपदी, तर फिरहाद हाकिम यांची पक्षाच्या व्हीपपदी नियुक्ती करण्याची मागणी विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांच्याकडे केली होती. मात्र, पक्षातील मोठ्या गटाने या प्रस्तावाला विरोध दर्शविला आहे. विधानसभेत टीएमसीचे ८० आमदार निवडून आले आहेत. त्यापैकी संदीपान साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांनी अलीकडेच मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या बैठकीला उपस्थिती लावल्याने त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. मात्र, हेच दोन्ही नेते आता ६० ***पान ४ वर***

# नांदेडमध्ये बंडखोर ठाम;माघारीच्या चर्चांना ब्रेक

नांदेड/प्रतिनिधी- नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीत ८ उमेदवारांचे अर्ज काल वैध ठरले आहेत. राज्यभरात माघारीसाठी बंडखोरांची समजूत घालुन अधिकृत उमेदवारांच्या विजयाचे मार्ग सुकर केले जात असतांना नांदेडमध्ये माघारीच्या हालचालींना तुर्तास तरी जैसे थे स्थिती कायम आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून रोजी संपत असताना महायुती आणि महाविकास आघाडीतील बंडखोर व इच्छुक उमेदवार आपल्या उमेदवारीवर ठाम दिसत आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ जागांसाठी विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून अनेक ठिकाणी बंडखोरीमुळे राजकीय समीकरणे बदलत आहेत. आज राज्यातील चार मतदारसंघांत भाजपप्रणित महायुतीने विजयाचा मार्ग सुकर केला आहे. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर आठ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. सत्ताधारी महायुतीकडून भाजपने माजी आ. अमरनाथ राजूरकर यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. मात्र महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विद्यमान आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचे सुपुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून महायुतीसमोरच पेच निर्माण केला आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर आणि माजी अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी अर्ज दाखल केला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून कृष्णा पाटील आष्टीकर व ज्योतिबा खराटे यांचे अर्ज वैध ठरले आहेत. कृष्णा पाटील आष्टीकर हे हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र आहेत. तर वंचित बहुजन आघाडीकडून काँग्रेस प्रणित आघाडीचे नगरसेवक तथा गटनेते प्रशांत इंगोले यांनी अर्ज दाखल केला असून, अपक्ष उमेदवार पंकज माणिकराव गायकवाड यांचाही अर्ज वैध ठरला आहे.

विशेष म्हणजे, भाजप नेते अशोक चव्हाण यांचे कट्टर विरोधक मानले जाणारे आ. चिखलीकर यांनी आपल्या पुत्राची उमेदवारी कायम ठेवल्याने महायुतीची डोकेदुखी ***पान ४ वर***



बदलत्या हवामानामुळे यंदा पावसाळा लांबण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याने दुपारच्यावेळी वाहनधारकांना अशा पध्दतीने डोक्याला रुमाल बांधुनच बाहेर पडावे लागत आहे.(छाया : करणसिंह बैस)

# शेतमाल व्यापारासाठी परवाना घेणे बंधनकारक:पणन संचालकांचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी- राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवसायासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम, १९६७ अंतर्गत आवश्यक परवाना घेणे बंधनकारक आहे. कोणत्याही व्यापाऱ्याने, संस्थेने, शेतकरी उत्पादक कँपनीने अथवा शेतमाल व्यापाराशी संबंधित इतर घटकांनी आवश्यक परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे पणन संचालक शरद जरे यांनी दिला आहे.

राज्यातील विविध भागांमध्ये अनेक व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कँम्न्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतमालाची खरेदी-विक्री विनापरवाना होत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयाला प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असतानाही काही व्यापारी व संस्था परवान्याविना शेतमाल व्यापार करत असल्याचे निदर्शनास आले आहे.महाराष्ट्र शासनाने दि.५ जुलै २०१६ रोजी अध्यादेश क्रमांक १५ राजपत्रात प्रसिद्ध केला असून, त्याच्या अंमलबजावणी बाबतच्या सूचना ८ जुलै २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या. तसेच ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार मुख्य अधिनियमाच्या ***पान ४ वर***

# शिवसेनेच्या एकीकरणासाठी शिंदेंनी ठाकरेंशी चर्चा करावी

## माजी मंत्री अब्दुल सत्तारांचे पुन्हा मोठे विधान

ठाणे: उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी चर्चा करून दोन्ही शिवसेना एकत्र आणण्याचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

महायुतीतील स्थानिक पातळीवरील अडचणी, शिवसेना कार्यकर्त्यांची नाराजी आणि आगामी निवडणुकांबाबतची चिंता व्यक्त करत शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनी भाजपवर टीका करत शिवसेनेच्या एकीकरणाबद्दल वक्तव्य केले होते. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आमदारांची बैठक पार पडली. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सत्तार यांनी आपल्या मनातील नाराजी उघडपणे व्यक्त केली. जिल्ह्यात शिवसेना आमदार आणि कार्यकर्त्यांना अपेक्षित निधी मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच मित्रपक्षातील काही स्थानिक नेत्यांकडून अडवणूक होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.मोठा भाऊ लहान भावाकडून सत्ता काढून घेत असल्याचे चित्र दिसत आहे. आम्ही महायुतीचा धर्म पाळत भाजपला वरची बाजू दिली; मात्र त्याचे योग्य मूल्यमापन झाले पाहिजे, असे सत्तार म्हणाले. आगामी २०२९ च्या निवडणुकांपूर्वी या प्रश्नांची दखल घेतली नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

विधान परिषद निवडणूक महायुती म्हणून लढविण्याच्या सूचना एकनाथ शिंदे यांनी दिल्या असून त्याचे पालन करणार असल्याचे सत्तार यांनी स्पष्ट केले. आमचे नेते एकनाथ शिंदे यांचा निर्णय अंतिम असेल आणि तो आम्हाला मान्य असेल, असेही त्यांनी सांगितले.दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात या विधानाबाबत बोलताना सत्तार म्हणाले की, ही भूमिका प्रथम ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी मांडली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना आपणही दोन्ही पक्षप्रमुखांनी चर्चा करावी, असे मत व्यक्त केले. सध्याच्या राजकीय परिस्थितीत शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता असून पक्षाच्या भवितव्याबाबत चिंतेचे वातावरण असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, सत्तार यांच्या वक्तव्यांनंतर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासह छत्रपती संभाजीनगरमधील सर्व शिवसेना आमदारांना मुंबईत बोलावून बैठक घेतली. या बैठकीत संघटनात्मक प्रश्न, स्थानिक राजकीय घडामोडी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकांबाबत चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली आहे. सत्तार यांनी व्यक्त केलेल्या नाराजीची दखल घेण्यात आल्याचेही बैठकीनंतर स्पष्ट झाले.

# विधानपरिषद निवडणुकीतही महायुतीला घवघवीत यशाचे संकेत

## 'मविआ'च्या काही उमेदवारांची माघार तर काही छाननीत बाद

मुंबई/प्रतिनिधी-विधान-परिषदेच्या १७ जागांसाठी होवू घातलेल्या निवडणुकीत आज उमेदवारी अर्ज छाननी, उमेदवारांची माघार आणि संख्याबळाचा विचार करता सोलापूर, यवतमाळ, अमरावती आणि नाशिक या चार मतदारसंघांत महायुतीच्या उमेदवारांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

राज्यातील १७ विधानपरिषद जागांसाठीची निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात प्रतिष्ठेची बनली असतानाच महाविकास आघाडीला मोठे धक्के बसले आहेत. महायुतीकडे बहुतांश मतदारसंघांत स्पष्ट संख्याबळ असल्याने निवडणुकीपूर्वीच तिचे पारडे जड दिसत आहे. दुसरीकडे, काही ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार रिंगणाबाहेर गेल्याने आघाडीची अडचण वाढली आहे.

**सोलापुरात काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद**

सोलापूर विधानपरिषद मतदारसंघात महायुतीकडून राजेंद्र राऊत मैदानात आहेत. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, अर्ज छाननी दरम्यान त्यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरल्याने आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या मतदारसंघात ६१४ मतदारांपैकी महायुतीकडे तब्बल ४२८ मतदारांचे संख्याबळ असून महाविकास आघाडीकडे केवळ ८१ मते आहेत. त्यामुळे राऊत यांचा विजय सुकर झाल्याचे मानले जात आहे.

**यवतमाळमध्ये आघाडीच्या उमेदवाराची माघार**

यवतमाळमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनीच निवडणुकीतून माघार घेतली आहे. संख्याबळ अपुरे असल्याचे कारण देत त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. काँग्रेसने दिलेल्या संधीबद्दल आभार व्यक्त करत त्यांनी निवडणूक लढविणे अशक्य असल्याचे स्पष्ट केले. या मतदारसंघात ४४६ मतदारांपैकी महाविकास आघाडीकडे केवळ १३१ मते असल्याने ही माघार राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

**अमरावतीत भाजप बंडखोराचा अर्ज बाद**

अमरावतीत भाजपचे अधिकृत उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्या विरोधात पक्षाचेच कार्यकर्ते विप्लव बजोरिया यांनी बंडखोरी करत अर्ज दाखल केला होता. मात्र, छाननी प्रक्रियेत त्यांचा अर्ज बाद ठरला. महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनी या अर्जावर आक्षेप घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अर्ज फेटाळला. त्यामुळे प्रवीण पोटे यांच्या विजयाचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे. या मतदारसंघात महायुतीकडे २२२ तर महाविकास आघाडीकडे १४८ मतदारांचे संख्याबळ आहे.

**नाशिकमध्ये मविआचा अधिकृत उमेदवारच नाही**

नाशिक विधानपरिषद मतदारसंघात महाविकास आघाडीने अधिकृत उमेदवारच दिलेला नाही. ही जागा ठाकरे गटाच्या शिवसेनेकडे असतानाही उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. त्यामुळे महायुतीविरोधात कोण उभे राहणार याबाबत अद्याप स्पष्टता नाही. सध्या शिवसेना-भाजप महायुतीचे नरेंद्र दराडे हे प्रमुख दावेदार असून ६०३ मतदारांपैकी महायुतीकडे ४५४ मतदारांचे भक्कम संख्याबळ आहे.

चारही मतदारसंघांतील घडामोडी, विरोधी उमेदवारांची माघार किंवा अर्ज बाद होणे आणि महायुतीचे असलेले मजबूत संख्याबळ यामुळे या जागांवर महायुतीचा विजय निश्चित मानला जात आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

# व्याजासह वसुली झालीच पाहिजे,शिक्षाही आवश्यक

**कल्याणकारी राज्य व्यवस्थेचा मूलभूत हेतू समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांना आधार देणे हा असतो. शासन विविध योजना राबवून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडविण्याचा प्रयत्न करत असते. मात्र या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक आणि जबाबदारीने झाली नाही तर त्याचा फटका केवळ सरकारी तिजोरीलाच बसत नाही, तर जनतेचा शासनावरील विश्वासही डळमळीत होतो. राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीत उघड झालेल्या गंभीर त्रुटींनी हाच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.मागील लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्यानंतर राज्यातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या युती सरकारने महिलांना आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यावर दरमहा दीड हजार रुपये जमा करण्यात येत होते. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची असल्याचा दावा करण्यात आला आणि त्याचा राजकीय लाभही सत्ताधाऱ्यांना झाल्याचे मानले जाते. परंतु कोणतीही योजना राबविताना तिची पात्रता, पडताळणी प्रक्रिया आणि निधी व्यवस्थापन यांचा सखोल विचार होणे आवश्यक असते. याच ठिकाणी प्रशासन अपयशी ठरल्याचे आता स्पष्ट होत आहे.या योजनेबाबत सुरुवातीपासूनच अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. राज्य सरकारने इतर अनेक कल्याणकारी योजनांचा निधी कमी करून किँवा वळवून लाडकी बहीण योजनेसाठी आर्थिक तरतूद केल्याचे आरोप विरोधकांनी केले होते. काही योजना केवळ कागदोपत्री ठेवण्यात आल्या आणि त्यांचा निधी या योजनेकडे वळविण्यात आल्याची चर्चा देखील झाली होती. शासनाने या आरोपांचे खंडन केले असले तरी आर्थिक प्राधान्यक्रम बदलल्याचे चित्र जनतेसमोर स्पष्टपणे दिसत होते. त्यामुळे या योजनेतील प्रत्येक रुपया योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे होते. परंतु प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर अपात्र व्यक्तींना लाभ मिळाल्याचे उघडकीस आल्याने संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारच्या तपासणीत लाखो लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबत शंका निर्माण झाली आहे. विशेषतः हजारो पुरुषांनी महिलांसाठीच्या योजनेत नाव नोंदवून लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. त्यात काही सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचे समोर आले आहे. सरकारी सेवेत असलेल्या आणि नियमांची पूर्ण माहिती असलेल्या व्यक्तींनीच शासनाची फसवणूक केली, ही बाब अत्यंत गंभीर आहे. हा प्रकार केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून सार्वजनिक विश्वासाला दिलेला तडा आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अपात्र ठरलेल्या महिलांकडून रक्कम वसूल केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. अनेक प्रकरणांमध्ये प्रशासनाच्या पडताळणीतील त्रुटीमुळे लाभ मिळाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वसामान्य महिलांवर अन्याय होऊ नये, ही भूमिका योग्य मानता येईल. मात्र ज्या व्यक्तींनी जाणीवपूर्वक खोटी माहिती दिली, बनावट कागदपत्रे सादर केली किँवा नियमांची जाणीव असूनही फसवणूक केली, त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे.विशेषतः पुरुष लाभार्थी आणि सरकारी कर्मचारी यांच्याकडून मिळालेली संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया राबविण्यात यावी. केवळ पैसे परत घेऊन प्रकरण मिटविणे हा चुकीचा संदेश देणारा निर्णय ठरेल. सार्वजनिक पैशांची फसवणूक करूनही शिक्षा होत नाही, असा समज निर्माण होणे लोकशाही व्यवस्थेसाठी घातक ठरेल. याहूनही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ही फसवणूक इतक्या मोठ्या प्रमाणावर घडलीच कशी? अर्जांची छाननी करणारी यंत्रणा कुठे अपयशी ठरली? संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी निष्काळजीपणा केला की त्यामागे काही संगनमत होते? काही अदृश्य शक्तींच्या मदतीने ही नावे समाविष्ट करण्यात आली का? या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. कारण दोष केवळ लाभार्थ्यांचा नसून यंत्रणेमधील त्रुटींचाही आहे.सार्वजनिक निधी हा कोणत्याही राजकीय पक्षाचा किँवा नेत्याचा नसतो. तो सामान्य करदात्यांच्या कष्टाच्या पैशातून उभा राहिलेला असतो. त्यामुळे त्याचा अपव्यय किँवा गैरवापर हा जनतेशी केलेला विश्वासघातच आहे. लाडकी बहीण योजनेतील गैरव्यवहारामुळे केवळ सरकारी तिजोरीचे नुकसान झालेले नाही, तर इतर कल्याणकारी योजनांच्या निधीबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांनाही बळ मिळाले आहे. म्हणूनच या प्रकरणात दोर्षींकडून वसुली झालीच पाहिजे; पण त्याचबरोबर कठोर शिक्षाही झाली पाहिजे. सार्वजनिक पैशांच्या लुटीला माफी नव्हे, तर कायद्याचा कठोर धाक हेच या प्रकरणाचे योग्य उत्तर ठरू शकते.**

# टिईटी:आता आंदोलनाची गरज नाही?

सध्या प्राथमिक स्तरावरील शिक्षकांना टिईटी परिक्षा अनिवार्य करण्यात आलेली आहे. न्यायालयानंच ती आणलेली असून त्यावर पुनर्विचार याचिका टाकण्यात आली होती. तिही फेटाळण्यात आलेली असून ती फेटाळण्यात विद्यार्थी भवितव्य व हित ही बाब विचारात घेतलेली आहे. मात्र आता शिक्षकात गुपचूप चर्चा आहे की सदर स्वरुपाची परिक्षा ही प्राथमिक शिक्षकांनाच का? माध्यमिक विभागाला का नाही? अल्पसंख्याक शाळेतील शिक्षकांना का नाही? एवढंच नाही तर जी मंडळी देश चालवितात. त्या मंत्री, आमदार, खासदार यांना तशा स्वरुपाची परिक्षा का नाही? अन् शेवटी ज्यांनी टिईटी परिक्षेचा निकाल दिला. त्या न्यायाधीशांनाही तशा स्वरुपाची परिक्षा का नाही? यावर खरंच विचार व्हावा. खरं तर त्या सर्वांचीच तशा स्वरुपाची परिक्षा घ्यायला हवी होती. ही शिक्षकांच्या मनातील गुपचूप चालत असलेली चर्चा. चर्चा बरोबर जरी असली तरी त्यांचं आज कोणीच ऐकणारं नाही. कारण ते गावखेड्यातील शेंबड्या मुलांना घडविणारे शिक्षक आहेत. त्यांना कितीतरी अनुभव जरी जास्त असला तरी तो कामाचा वाटत नाही. त्याचंही एक कारण म्हणजे सरकारी प्राथमिक शिक्षकांची संख्या वाढलेली आहे. तसे त्यांचे वेतनही वाढलेले आहे. त्यामानानं प्राथमिक शाळेत शिकणारी मुलं कमी झालेली आहेत. ती कॉन्व्हेंटला जात आहेत. ज्यातून शिक्षकांचे वेतन देण्यात सरकारचा जास्त पैसा खर्च होतो. तो देणं परवडत नाही. त्यासाठी शिक्षक कमी करायचे आहेत. त्याचं माध्यम सरकारला टिईटी वाटतंय. ज्यातून पात्र न ठरणाऱ्या शिक्षकांची संख्या निश्चीतच कमी करता येईल. जेणेकरुन शिक्षकांना देण्यात येणारं वेतन निश्चीतच कमी होईल. हे शिक्षकाच्या गुपचूपच्या वार्तालापातील मत. यावर विचार होणे गरजेचे आहे. आता पाहूया पुढील काळात टिईटीतून शिक्षक गाळले जाणार आहेत की तसेच सेवेत ठेवले जाणार आहेत का ते.

अलिकडील काळात जनगणना सुरु आहे भारताची. तिही भर उन्हाळ्यात सुरु आहे. ज्यात तापमान हे सर्वोच्च स्थानावर पोहोचलेले आहे. त्यातच विदर्भाचा विचार केल्यास सांगता सोय नाही. सध्या विदर्भातील तापमान सर्वोच्च स्तरावर पोहोचलेले आहे.जनगणना, मतगणना या शिक्षकांच्या माथ्यावर असणाऱ्या नव्हे तर पडणाऱ्या गोष्टी. मग उन्हाळा असो की पावसाळा असो, शिक्षकांना ती कामं करावीच लागतात. कारण असतं, त्याचं पोट आणि त्याच्या परीवाराचं पोट. ते पोट भरायचं असतं. म्हणूनच मजबुरीनं शिक्षक ती कामं करीत असतात, जरी ती कामं जोखमीची असतील तरीही. तसं पाहिल्यास शिक्षकांना बरीच कामं असतात. ती कामं ते करतात, शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवून देखील. त्यांनी बीएलओ, एसएलआर, निवडणूक, मराठा सर्वेक्षण, शाळाबाह्य विद्यार्थी शोधणे, नवसाक्षरता, तशीच गतकाळात आलेले शौचालय बांधण्याचे काम आणि नुकतेच पार पडलेले कुत्र्याच्या बंदोबस्त करण्याचे काम. तिही कामं केलेली आहेत.

शिक्षक बरीच कामं करतात. त्यांनी कोरोना लाटेतही अगदी जीवावर उदार होवून काम केलं. ज्यात कितीतरी शिक्षक मरण पावले आणि आता भर उन्हाळ्यात जनगणना करीत आहेत. ज्यात आतापर्यंत दोन शिक्षक उष्माघातानं मरण पावले व दोघांचे जनगणनेचं कार्य करीत असतांना अपघात झालेत.शिक्षक बरीच कामं करतात. तरीही शिक्षकांना सुख नाहीच. ते पात्र नाहीत असंच सरकारला वाटतं आणि न्यायालयालाही अगदी तसंच वाटतं. ज्यातून त्यांनी टिईटी




परिक्षा आणली. टिईटी परिक्षा. शिक्षकांना पात्र ठरविणारी परिक्षा. ती परिक्षा दिल्यावर व पास झाल्यावर शिक्षक पात्र ठरणार आहेत. याचाच अर्थ ते जनगणना करुन, कोरोनासारख्या भीषण संकटात काम करुन, कुत्र्यांचा बंदोबस्त लावतांना जीवावर उदार होवून काम करुन, निवडणूक कामात सरकारचे काम करुन सरकारला मदत करुन, शाळेत आपल्या विद्यार्थ्यांना आपुलकीनं शिकवून पात्र ठरणार नाहीत.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

टिईटी परिक्षा कोणासाठी अनिवार्य असायला हवी होती? या प्रश्नाच्या बाबतीत विचार केल्यास, ती त्यांनाच अनिवार्य करायला हवी होती, जे देशाचा कारभार पाहतात. जे देशाची स्थिती कशी चालवत आहेत. ते तपासतात, अर्थात न्यायदान करतात. तसेच जे उच्चशिक्षीत आहेत. ज्यांना जास्त स्वरुपाचं ज्ञान आहे. ते वरच्या स्तरातील विद्यार्थ्यांना शिकवतात. जसे वर्ग आठवी ते बारावीला शिकविणारी शिक्षक मंडळी. त्यांना विद्यार्थ्यांना शिकवीत असतांना सर्वकष प्रकारचं ज्ञान हवं असतं. ज्यात विद्यार्थ्यांना शिकवीत असतांना विविध गोष्टी शिक्षकांना येणं गरजेचं असतं. त्यामुळं त्यांना टिईटी आवश्यकच असायला हवी होती. परंतु मा. न्यायाधीश महोदयांनी त्यांना सोडलं व जे शिक्षक आपल्यातील ज्ञानाच्या भरवशावर आपल्या वर्गातील शेंबड्या मुलांना शिकवतात. ज्यांना शिकवितांना टिईटी परिक्षेत येणाऱ्या प्रश्नांचा काहीही संबंध नसतो. अशाच शिक्षकांना धारेवर धरलेलं आहे. ही शोकांतिकाच आहे. महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की ज्या शिक्षकांना प्राथमिक स्तरावर शिकवीत असतांना जास्त प्रमाणात अपडेट होण्याची आवश्यकता नसते.


पुर्वी टिईटी नव्हती. म्हणून विद्यार्थी घडले नाहीत का कालचे. तेही घडलेत. ज्यातून कोणी इंजीनिअर बनलेत. कोणी डॉक्टर बनलेत. कोणी वकील तर कोणी न्यायाधीश. तसं पाहिल्यास प्राथमिक वा उच्च प्राथमिक शाळेत शिकविणारे सर्वच शिक्षक, त्यांनी काल काही टिईटी परिक्षा दिलेली नव्हती. तरीही त्यांनी चांगले विद्यार्थी घडविले. ज्यांच्या शिकविण्यातून त्यांच्या हातून शिकणारी मुलं ही उच्चश्रेणीची डॉक्टर झालीत. कोणी न्यायाधीशही झालीत. कोणी संशोधक झालीत नव्हे तर होत आहेत. तरीही आज त्याच प्राथमिक स्तरावर शिकविणाऱ्या शिक्षकांना टिईटीची सक्ती. ज्यातून त्यांना नोकरीवरुन काढून टाकण्याचा विचार. ही देखील शोकांतिकाच आहे. विशेष बाब ही महत्वपुर्ण आहे की आज विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांच्या अनुभवाची गरज आहे. टिईटी सारख्या परिक्षेची गरज नाहीच. तरीही न्यायाधीश महोदय शिक्षकांना टिईटी अनिवार्य करतात. तेही फक्त प्राथमिक शाळेतील शिक्षकांना. यातून नक्कीच हाच बोध होत आहे की प्राथमिक शाळेतील शिक्षकांची संख्या जास्त आहे व सदर शाळेत विद्यार्थी संख्या कमी प्रमाणात आहे. याऊलट कॉन्व्हेंट शाळेत विद्यार्थी जास्त आहे. त्यामुळं नक्कीच अशा प्राथमिक शाळेतील शिक्षकांना कोणत्या ना कोणत्या माध्यमातून कमी करायचे आहेत. त्यासाठी माध्यम आहे टिईटी ज्यातून नक्कीच शिक्षकांना ती परिक्षा पास झाले नाही तर काढून टाकता येईल. हा सरकारचा प्रयत्न. ज्यात सरकारनं स्वतः पुढं न येता न्यायालयाला माध्यम केलेलं आहे. आता टिईटी माध्यम नक्कीच सक्षम ठरणार आहे व नक्कीच अशा प्राथमिक शाळेत जास्त झालेल्या शिक्षकांना वेठीस धरुन त्यांना टिईटी माध्यमातून काढून फेकणार आहेत. ज्यातून सरकारचाच पैसा वाचेल, शिक्षकांवर खर्च होणारा. कारण असंच जर काढून टाकलं तर शिक्षक आंदोलन करतात. ज्यातून सरकारलाच एक पाऊल मागं सरकावं लागतं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आज प्राथमिक शाळेत विद्यार्थी नाहीत. त्यांची संख्या कमी झालेली आहे. त्याचं महत्वपुर्ण कारण आहे, पालकांची मानसिकता. प्राथमिक शाळेत मुलं कमी झाली. ती माध्यमिक शाळेत तेवढ्या प्रमाणात कमी झाली नाहीत. त्याचं कारण आहे पालकांची मानसिकता. ज्यावेळेस मुलं लहान असतात. त्यावेळेस मुलांचा शाळा प्रवेश करतांना पालकांना फार आनंद वाटतो. त्यावेळेस कॉन्व्हेंटमधील नर्सरी, के जी वन व के जी टू चे शुल्कही कमी असते. ते शुल्क पालक सहज भरु शकतो. म्हणूनच प्राथमिक शाळेत विद्यार्थी कमी दिसतात. परंतु जसजशी इयत्ता वाढत जाते. तसं शुल्क वाढत जातं. ते शुल्क पालकांना भरणं सहज शक्य होत नाही. मग तेच पालक आपली मुलं कॉन्व्हेंट मधून काढून सरकारी निःशुल्क स्वरुपात असलेल्या शाळेत आणून टाकतात. ती वेळ असते इयत्ता आठवीत गेलेल्या विद्यार्थ्यांची अर्थात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची. ज्यात शिक्षकांच्या स्तरानुसार विद्यार्थी जास्त जरी झाले असले तरी ते जास्त प्रमाणात वाढलेले वाटत नाहीत. त्यामुळं माध्यमिक विभाग स्तरावर टिईटी नाही. कारण त्या विभागात ना अतिरिक्त शिक्षक असतात. ना अतिरिक्त शिक्षकांना जास्तीचे वेतन द्यावं लागत. ना त्या वेतनाचा भुर्दंड सरकारवर येत. विशेष म्हणजे सर्वात मोठी गोष्ट असते अनुभव. शिक्षकांना असणारा अनुभव. त्यांनी टिईटी परिक्षा नाही दिली तरी ते उत्तम पद्धतीनं आपल्या विद्यार्थ्यांना शिकवीत असतातच. परंतु सरकारला ते मान्य नाही. न्यायालयाला तर नाहीच नाही. म्हणूनच टिईटी परिक्षा. आता ठरवावे शिक्षकांनी की टिईटी परिक्षा द्यावी की घरी बसावे. जर नोकरीत टिकून राहायचे असेल तर त्यांना टीईटी परिक्षा द्यावीच लागेल. जरी त्या परिक्षेत शेंबड्या मुलांना शिकविण्यास उपयोगात येणारे प्रश्न नसतील तरी. कारण तो न्यायालयाचा आदेश आहे आणि ती देशाची गरज आहे, असं न्यायालयालाही वाटत आहे. त्यासाठी आता आंदोलन करण्याची गरज नाही वा पेटून उठण्याची गरज नाही. हे तेवढंच खरं.

# वाढत्या इंधन दरांवर "सायकल टू वर्क"हा स्मार्ट उपाय

आज ३ जून जागतिक सायकल दिवस. देशात वाढते पेट्रोल-डिझेल दर, वाहतूक कोंडी, वायू प्रदूषण आणि वाढता जीवनावश्यक खर्च या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. नुकतेच देशाचे पंतप्रधान यांनी नागरिकांना इंधन बचत, काटकसर आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. मात्र कोणतीही समस्या केवळ सरकारच्या उपाययोजनांनी सुटत नाही; त्यासाठी नागरिकांनीही आपल्या जीवनशैलीत बदल करणे आवश्यक असते. माझ्या मते, सायकल टू वर्क ही अशा बदलाची सर्वात सोपी, प्रभावी आणि शाश्वत सुरुवात आहे.

आज बहुतेक शहरांमध्ये कार्यालये, दवाखाने, बँका, शासकीय कार्यालये आणि दैनंदिन कामांची ठिकाणे ५ ते १० किलोमीटरच्या परिसरात असतात. तरीही अगदी छोट्या अंतरासाठी मोटारसायकल किँवा कार वापरण्याची सवय वाढत चालली आहे. वाहन हे गरजेपेक्षा प्रतिष्ठेचे प्रतीक बनत आहे. दोन किँवा चार व्यक्तींसाठी तयार केलेली वाहने बहुतेक वेळा एकाच व्यक्तीकडून वापरली जातात.



परिणामी इंधनाचा अपव्यय, प्रदूषण आणि वाहतूक कोंडी वाढते. आपण शाळा-कॉलेजच्या काळात सहज १५ ते २० किलोमीटर सायकल चालवत होतो. मग आज काही किलोमीटरसाठी सायकल वापरण्यात कमीपणा का वाटावा? सायकल हा अनेक समस्यांवर एकाच वेळी उपाय आहे. इंधन बचत, उत्तम आरोग्य, प्रदूषण कमी करणे, ट्रॅफिक जाम आणि पार्किँग समस्यांवर नियंत्रण, तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करणे असे अनेक फायदे सायकलिंगमुळे मिळतात.

काटकसरीची प्रेरणा मला अमेरिकन तत्त्वज्ञ हेन्री डेव्हिड थोरो यांच्या Walden या पुस्तकातून मिळाली. साधेपणा, स्वावलंबन आणि मितव्ययी जीवनशैली हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. सायकल टू वर्क ही माझ्यासाठी केवळ वाहतुकीची पद्धत नसून जीवनशैलीचा भाग आहे. १ ऑक्टोबर २०१७ पासून मी क्लिनिकमध्ये ये-जा करण्यासाठी नियमितपणे सायकलचा वापर करत आहे. आजपर्यंत एकदाही दुचाकीचा वापर न करता सायकलवरूनच प्रवास केला आहे. या सातत्यपूर्ण प्रयत्नातून मी २०,४५५ किलोमीटरपेक्षा अधिक सायकलिंग करत ९४,४१० पेक्षा अधिक इंधन बचत केली आहे. हा केवळ आर्थिक बचतीचा आकडा नसून आरोग्य, पर्यावरण संरक्षण, स्वअनुशासन आणि काटकसरीच्या जीवनमूल्यांची प्रत्यक्ष अनुभूती आहे. सायकलिंग हा माझ्यासाठी केवळ व्यायाम किँवा छंद नाही.

**डॉ.पवन चांडक**

२०१३ पासून आजपर्यंत भारतातील महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, मध्यप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा, ओडिशा आदी मिळून १४ राज्यांमध्ये तसेच जर्मनी, फ्रान्स, स्कॉटलंड आणि इंग्लंड या चार देशांमध्ये १,१३,९७३ किलोमीटरपेक्षा अधिक सायकल प्रवास केला आहे.

या सायकल मोहिमांद्वारे एचआयव्ही/एड्स जनजागृती, पर्यावरण संवर्धन, कौटुंबिक वाचन चळवळ, मोबाईल व्यसनमुक्ती, महिलांचे आरोग्य, बेटी बचाओ-बेटी पढाओ, सायकल वापराचा प्रसार आणि शाश्वत जीवनशैली यांसारख्या विषयांवर जनजागृती करण्याची संधी मिळाली. परभणी ते मुंबई वाचन संस्कृती जनजागृती सायकल यात्रा, नागपूर ते जगन्नाथपुरी सायकल संवाद यात्रा, आळंदी ते पंढरपूर सायकल वारी, महिला आरोग्य जनजागृती सायकल मोहीम आणि अटारी बॉर्डर ते उज्जैन पर्यावरण व एड्स जनजागृती सायकल मोहीम यांसारख्या अनेक उपक्रमांचे नेतृत्व करण्याची संधी लाभली.सायकल टू वर्क ही केवळ वैयक्तिक सवय नसून सामाजिक चळवळ बनू शकते. यासाठी सुरक्षित सायकल ट्रॅक, सायकल पार्किँग सुविधा, शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृती आणि विद्यार्थ्यांना सायकल वापरण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

जर प्रत्येक नागरिकाने आठवड्यातून किमान दोन दिवस सायकल टू वर्क स्वीकारले, तर लाखो लिटर इंधनाची बचत होऊ शकते. त्याचबरोबर आरोग्यदायी जीवनशैली आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण होण्यास मदत होईल.आज गरज आहे ती केवळ इंधन दरांवर चर्चा करण्याची नाही, तर स्वतः पासून बदल सुरू करण्याची.सायकल ही केवळ वाहन नाही; ती काटकसर, स्वावलंबन, आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत भविष्यासाठीची दिशा आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ९ रोजी पेन्शन अदालत

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जून-२०२६ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ९ जून रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# धानोरा मंडळातील १८ गावांतील पीकविमा रखडल्याने संताप;शेतकऱ्यांचे बैलगाड्यांसह रास्ता रोको आंदोलन

## ३० जून पर्यंत विमा न मिळाल्यास तीव्र लढ्याचा इशारा




उमरी/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील धानोरा (बु.) मंडळातील सुमारे १८ गावांतील शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा मिळाला नसल्याने संतप्त झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मंगळवारी उमरी शहरातील मामा चौकात बैलगाड्यांसह रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर आणि युवा नेते सुधाकरराव देशमुख धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनामुळे उमरी-भोकर, उमरी-मुदखेड आणि उमरी-धर्माबाद मार्गावरील वाहतूक सुमारे दोन ते तीन तास पूर्णपणे ठप्प झाली.

पीकविम्याची रक्कम न मिळाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी बैलगाड्यांसह रस्त्यावर ठिय्या मांडला. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, खासगी वाहने तसेच प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. भर उन्हात महिला, लहान मुले आणि नागरिकांना रस्त्यावरच थांबावे लागल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती. आंदोलनाची माहिती मिळताच कृषी विभाग, महसूल विभाग, पीकविमा कंपनी आणि पोलिस प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारून प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, ३० जूनपर्यंत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविम्याची रक्कम जमा न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला. मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या आंदोलनात धानोरा (बु.) मंडळातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. मृग नक्षत्र जवळ आले असून खरीप हंगामाच्या पेरणीसाठी बियाणे, खते आणि इतर शेतीकामांसाठी निधीची गरज असताना पीकविमा मिळत नसल्याने शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. यावेळी कैलास देशमुख गोरठेकर, सुधाकर देशमुख धानोरकर, दिगंबर जगताप, दिलीप पाटील सावंत आदींनी मनोगत व्यक्त करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. आंदोलनात दत्तराव देशमुख, गणेशराव आनेमवाड, बालाजी पंतोजी, उद्धव मामडे, आकाश सैदमवार, विठ्ठल नारलेवाड, वर्षा चंद्रकांत जाधव, वसंत जाधव, बालाजी सूर्यवंशी, नागेश बट्टेवाड यांच्यासह धानोरा, बोळसा, तुराटी, बोथी, मंडाळा, रामखडक, हुंडा, सावरगाव आदी गावांतील शेकडो शेतकरी व महिला सहभागी झाल्या होत्या.आंदोलनस्थळी पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे, डीएसबीचे कोलबुद्धे, पोलीस उपनिरीक्षक सचिन आरमाळ, डीएसबीचे पठाण, महसूल विभागाचे संजय सोलंकर, तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे तसेच पीकविमा कंपनीचे अधिकारी दीपक मस्के उपस्थित होते.

### धानोरा मंडळ पीकविम्यासाठी पात्रः कृषी अधिकाऱ्यांची माहिती

तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी सांगितले की,धानोरा (बु.) मंडळातील एका पीक कापणी प्रयोगासंदर्भात विमा कंपनीने आक्षेप नोंदविला होता. या आक्षेपाची दखल घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत संबंधित बाबींची तपासणी करून आक्षेपाचे निराकरण करण्यात आले असून सुधारित अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. सध्या विमा कंपनीकडून कोणताही आक्षेप प्रलंबित नसून धानोरा (बु.) मंडळ पीक विम्यासाठी पात्र ठरले आहे. विमा पोर्टलवर नुकसानभरपाई निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध निधीनुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अखेर मुंडे चौकातील बंद हायमॅक्स उजळला

## स्वराज्य मित्र मंडळाच्या पाठपुराव्याला यश

कुंडलवाडी/प्रतिनिधी-शहरातील स्व.गोपीनाथराव मुंडे चौक येथे गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेला हायमॅक्स एलईडी लाईट अखेर सुरू करण्यात आला असून, यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. श्री स्वराज्य मित्र मंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

कुंडलवाडी शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या मुंडे चौकातील हायमॅक्सचा विद्युत पुरवठा अनेक वर्षांपासून खंडित होता. त्यामुळे रात्रीच्या वेळी चौक व परिसर अंधारात राहत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. अंधारामुळे अपघात तसेच इतर गैरप्रकार घडण्याची शक्यता वाढली होती.या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी श्री स्वराज्य मित्र मंडळाने नगरपालिका प्रशासनाकडे निवेदन सादर करून हायमॅक्सचा विद्युत पुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. मंडळाच्या मागणीची दखल घेत नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर प्रशासनाने हायमॅक्सचा विद्युत पुरवठा पूर्ववत सुरू केला.हायमॅक्स सुरू झाल्याने चौक परिसर पुन्हा प्रकाशमय झाला असून नागरिकांनी नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई कोटलावार तसेच नगरपालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत.दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित होऊन श्री स्वराज्य मित्र मंडळ सामाजिक, सार्वजनिक व विकासात्मक प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असून, भविष्यातही जनहिताच्या विविध प्रश्नांसाठी अशाच पद्धतीने प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



जातीय भावनेतून घरासमोर बोअर मारण्यास मज्जाव करणाऱ्यांना आवर घालून बोअर पाडण्यास परवानगी मिळवून द्यावी या मागणीसाठी बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर आणि नगरसेवक गणेश गोडबोले यांच्या नेतृत्वातील एका शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना निवेदन दिले. यावेळी सौ.शोभाबाई देवराव नवघडे, राहुल वाघमारे, श्रीमती नवघडे, ॲड.लता नवघडे, अमोल राऊत, कमलबाई नवघडे, उमाबाई नवघडे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# कृषि विभागाची धडक कारवाई;१२ लाख ३८ हजाराचा मुद्देमाल जप्त

## विनापरवाना बीटी कापुस बियाणे विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-मुखेड शहरात विनापरवाना विटी कापुस बियाणाची विक्री केल्या प्रकरणी तेलंगना राज्यातील श्रीधर पेन्शलवार विरुध्द मुखेड पोलीसात गुन्हा नोंदविण्यात आला या कार्यवाहीत सुमारे १२ लाख ३७ हजार ९९२ रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

दि.१ जुन रोजी रात्री मुखेड येथे नवा मोंढा परीसरातील संगमेश्वर कृषि सेवा केंद्राजवळ एका कारमधुन अनाधीकृतरित्या विनापरवाना बिटी कापुस बियाणांची विक्री सुरु असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली त्यानुसार जिल्हास्तरीय भरारी पथकातील पथक अध्यक्ष मोहिम अधिकारी जिल्हा परीषद सचिन कपाळे, जिल्हा भरारी पथकातील सदस्य सचिव व जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अमोल पेकम, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील गुणनियंत्रण तंत्र अधिकारी बालाजी मुंडे, मुखेड पंचायत समितीचे कृषि अधिकारी(गुनि) अरविंद आकात, मुखेड कृषि अधिकारी कार्यालयातील गुणनियंत्रण निरिक्षक कुलदिप वाघमारे यांच्या पथकाने संयुक्त कार्यवाही केली. तपासणी दरम्यान तेलंगणा राज्यातील भैसा येथील श्रीधर पेन्शलवार हा कारमध्ये (टिजी १८ ए ४९७०) बीटी कापूस बियाण्यांचा साठा घेऊन विक्रीसाठी आला असल्याचे आढळून आले. वाहनातील पोत्यांची तपासणी केली असता आरसीएच-६६८ वाणाचे एकूण १९२ पाकिटे आढळून आली. या बियाण्यांची किंमत सुमारे १ लाख ८७ हजार ९९४ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय कार १० लाख ५० हजार असा एकूण १२ लाख ३७ हजार ९९२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशी दरम्यान संबंधिताकडे महाराष्ट्रात बीटी कापूस बियाणे विक्री करण्यासाठी आवश्यक परवाना, पक्की पावती अथवा वैध कागदपत्रे नसल्याचे समोर आले. तसेच संबंधित वाणाला महाराष्ट्रात विक्री परवाना नसल्याची माहिती कंपनीच्या प्रतिनिधींनीने दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. संशयित बियाण्यांचे नमुने घेऊन ते बीज परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. याप्रकरणी श्रीधर पेन्शलवार (रा. भैसा, जि. निर्मल, तेलंगणा) याच्याविरुद्ध मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# टेम्पो-मोटरसायकल अपघातात १ ठार १ जखमी

मुखेड/प्रतिनिधी-येथून आपल्या गावी मंग्याळकडे गॅसची टाकी भरून घेऊन जात असताना टेम्पो- मोटर सायकलचा अपघात झाला. या अपघातात राहुल श्रावण सोनकांबळे, (वय ४०) रा. मंग्याळ यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांचा मुलगा जितेंद्र राहुल सोनकांबळे (वय १५) यास मार लागल्यामुळे त्याच्यावर मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले आहे.

सध्या गॅसची टंचाई असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक गॅस घेऊन जाण्यासाठी मुखेड येथील अस्मिता गॅस एजन्सी समोर सकाळी सात वाजता पासूनच रांगा लावत आहेत. आपल्या घरी गॅसची टाकी भरून घेऊन जावी म्हणून राहुल सोनकांबळे हे आपला मुलगा जितेंद्र सोनकांबळे यास मोटरसायकल वर बसून मुखेडला आले होते. मुखेड येथून मंग्याळकडे गॅसची टाकी भरुन घेऊन जात असताना जांब बु. कडून येणाऱ्या टेम्पोने मोटरसायकलला जबर धडक दिल्याने राहुल सोनकांबळे यांचा जागीच मृत्यू झाला तर मुलगा जितेंद्र सोनकांबळे यांच्यावर मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. उमाकांत गायकवाड, डा. शोभा देवकते, परिचारिका तुलसी नाईक, कदम सिस्टर आदींनी उपचार केला. सदर घटना आज दुपारी दोन ते तीनच्या दरम्यान शिरूर (दबडे)पाटी येथे घडली.

# निवडणूक निरीक्षक डॉ.माधवी खोडे-चवरे नांदेडमध्ये दाखल

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या व्दिवार्षीक निवडणूक-२०२६ साठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे (भाप्रसे) यांचे १ जून रोजी नांदेड येथे आगमन झाले. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन निवडणूक विषयक कामकाजाची पाहणी केली.



त्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांशी याप्रसंगी चर्चा केली. तसेच विविध निवडणूक कक्षासह, प्राप्त नामनिर्देशन अर्ज व मतदार यादीबाबत माहिती घेतली. येथील स्नेहनगर शासकीय विश्रामगृहात निवडणूक काळात त्या थांबणार आहेत. नागरिकांना नांदेड विधान परिषदेच्या निवडणुकी संदर्भात असणाऱ्या समस्यांबाबत २ ते ४ जून , १२ ते १४ जून आणि १७ ते २२ जून २०२६ या कालावधीत त्यांच्याशी संपर्क साधला जाऊ शकतो. त्यांचा ई-मेल आयडी obrerver.mlc.nedgmail.com आहे. त्यांचा संपर्क क्र. ९६३७२२८९५५ आहे.

**टी.सी.हरवली आहे**

माझी आकाश बळीराम जाधव या नावाची इयत्ता ७ वी पासची टी.सी.देगलूर ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
**आकाश बळीराम जाधव**
रा.लाईन गल्ली देगाव रोड,देगलूर जि.नांदेड.
मो.नं.८५५२८७८४४४

# प्रवाशां अभावी मुंबई-हैदराबाद उन्हाळी विशेष रेल्वेच्या फेऱ्या रद्द

नांदेड/प्रतिनिधी-मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हैदराबाद दरम्यान धावणाऱ्या उन्हाळी विशेष रेल्वे गाड्यांना प्रवाशांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे मध्य रेल्वेने एक मोठा निर्णय घेतला आहे. प्रवाशांची संख्या अत्यंत कमी नोंदवली गेल्याने या मार्गावरील विशेष गाड्यांच्या काही फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. दोन्ही दिशा मिळून प्रत्येकी ४ अशा एकूण ८ फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

दरम्यान, ज्या प्रवाशांनी या गाड्यांचे आधीच आरक्षण केले होते, त्यांना रेल्वेच्या प्रचलित नियमांनुसार तिकिटाच्या भाड्याची पूर्ण परतफेड केली जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हैदराबाद उन्हाळी विशेष (०१०११) दि.८ व २५ जून, २ व ९ जुलै रोजी सुटणारी गाडी रद्द करण्यात आली आहे. हैदराबाद-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस उन्हाळी विशेष (०१०१२) दि.१८,२५ जून, २ व ९ जुलै रोजी सुटणारी गाडी रद्द करण्यात आली आहे. अशा प्रकारे दोन्ही दिशांमध्ये प्रत्येकी चार फेऱ्या, एकूण आठ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी ऐनवेळी होणारी धावपळ टाळण्यासाठी प्रवासाला निघण्यापूर्वी रेल्वेची अधिकृत चौकशी प्रणाली, ॲप संकेतस्थळ किंवा रेल्वे हेल्पलाईनद्वारे गाड्यांच्या अद्ययावत स्थितीची माहिती तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मुखेड शहर काँग्रेसच्या वतीने प्रशासनाचा निषेध

मुखेड/प्रतिनिधी-येथील दुय्यम निबंधक कार्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी न केल्याचा प्रकार समोर आल्यानंतर मुखेड शहर काँग्रेसच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी शासकीय कार्यालयात अभिवादन करणे बंधनकारक असताना येथील दुय्यम निबंधक कार्यालयाने याकडे दुर्लक्ष केल्याचे सांगण्यात येते. या प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात शहर काँग्रेसने प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर जोरदार ताशेरे ओढले आहेत. दरम्यान, या प्रकरणी कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सुरक्षित प्रवासासाठी एसटीला पसंती द्या-आगार प्रमुख अशोक चव्हाण

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रवाशांचा सन्मान;३१ चालकांचा गौरव

किनवट/प्रतिनिधी-प्रवाशांनी लांबपल्याच्या प्रवासाकरिता दुचाकी अथवा इतर वाहनांचा वापर करण्यापेक्षा एसटीने सुरक्षित प्रवास करावा. प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन आगार प्रमुख अशोक चव्हाण यांनी केले. १ जून रोजी किनवट आगारात परिवहन महामंडळाचा ७८ व्या वर्धापन दिन साजरा करण्यात आला. छोटेखानी कार्यक्रमाच्या मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका मुकुंद्द नेम्मानीवार, नगरसेविका अश्विनी जागरलावार, प्रभू कोल्हे, कार्यशाळा अधीक्षक वाय. एच. खिल्लारे व जेष्ठ प्रवाशांची प्रमुख उपस्थिती होती.

बसस्थानकात महिला प्रवासी व ज्येष्ठ प्रवाशांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी प्रवाशांच्या सोयीसाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुचविल्या तर काहींनी किनवट आगाराकडून लांब पल्ल्यांच्या गाड्या चालू कराव्यात अशी मागणी केली. अश्विनी जागरलावार यांनी आपल्या मनोगतात सर्व प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. एसटी कर्मचारी कोंडे यांनी प्रवाशांकडून एसटी व परिसरात स्वच्छतेसाठी सहकार्याची विनंती केली. नांदेड विभागातून किनवट आगाराला प्रथम क्रमांक मिळवून दिल्याबद्दल आगार प्रमुख अशोक चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात आले. पंधरा वर्ष विना अपघात सुरक्षित सेवा देणाऱ्या ३१ चालकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन त्याचा गौरव करण्यात आला. शेवटी केक कापून व पेढे वाटून वर्धापन दिन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.वाहतूक अधीक्षक शिलरत्न ढगे, वाहतूक निरीक्षक साईनाथ मुंडे, गंगय्या सटलावार, शंकर ताडेवार, गजेंद्र दासरवार, व एसटीचे चालक, वाहक, प्रशासकीय व यांत्रिक कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संतोष अनंतवार यांनी केले.



# सा.बां.विभागाच्या मुख्य अभियंता रुपा राऊळ-गिरासे यांच्याकडून स्काय वॉक प्रकल्पाची पाहणी

## प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना:६ जून रोजी ना.नितीन गडकरी घेणार आढावा



माहूर/प्रतिनिधी-माहूर गडावर सुरू असलेल्या महत्त्वाकांक्षी लिफ्ट व स्काय वॉक प्रकल्पातील आवश्यक बदलांची कामे पूर्ण झाली असून नवीन डिझाईनही अंतिम करण्यात आले आहे. आता प्रकल्पाचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करावे, अशा सक्त सूचना सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेडच्या मुख्य अभियंता रुपा राऊळ-गिरासे यांनी संबंधित ठेकेदारांना दिल्या.

माहूर येथील श्री रेणुका माता मंदिर परिसरात सुरू असलेल्या लिफ्ट व स्काय वॉक प्रकल्पाच्या प्रगतीचा प्रादेशिक स्तरावरून वेळोवेळी आढावा घेतला जात आहे. त्यानुसार दि.२ जून रोजी क्षेत्रीय पाहणी दौरा व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी यापूर्वी देण्यात आलेल्या सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची तसेच कामाच्या प्रगतीची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून सादर करण्यात आली.मुख्य अभियंता रुपा राऊळ-गिरासे यांनी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून कामाबाबत समाधान व्यक्त केले. मात्र प्रकल्प अधिक विलंब न लावता तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.यावेळी कार्यकारी अभियंता विशाल चोपडे, उपविभागीय अभियंता भिसे, शाखा अभियंता आकाश राठोड, कनिष्ठ अभियंता पवन हनचाटे तसेच गुरुबक्षानी कंपनीचे अभियंता विडेकर व रिजवान खान उपस्थित होते.

### ६ जून रोजी ना.नितीन गडकरी घेणार आढावा

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या माहूर गडाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. दरवर्षी लाखो भाविक श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी येथे येतात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे कुलदैवत असल्याने त्यांनी माहूर गडाच्या विकासासाठी विशेष लक्ष दिले आहे.सध्या मंदिरात जाण्यासाठी भाविकांना सुमारे २४० पायऱ्या चढाव्या लागतात. वृद्ध, आजारी आणि दिव्यांग भाविकांसाठी ही चढण मोठी अडचण ठरते. ही समस्या लक्षात घेऊन स्काय वॉक व कॅप्सूल लिफ्ट प्रकल्पाची संकल्पना पुढे आणण्यात आली. या प्रकल्पांतर्गत टेकडीच्या पायथ्यापासून थेट मंदिरापर्यंत चार अत्याधुनिक कॅप्सूल लिफ्ट उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि कमी वेळेत दर्शन घेणे शक्य होणार आहे. सुमारे ५१ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला विविध टप्प्यांवर प्रशासकीय मंजुरी मिळालेली असली तरी मागील तीन वर्षांपासून विविध कारणांमुळे काम रखडले आहे. प्रकल्पाच्या कामाचा वेग अत्यंत मंद असल्याची नाराजीही सातत्याने व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर दि. ६ जून रोजी नागपूर येथे नामदार नितीन गडकरी संबंधित विभागाची बैठक घेऊन प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेणार असल्याची माहिती मिळाली आहे.

## कॉक्रोच जनता पार्टीकडून ३ प्रवक्त्यांची नियुक्ती

नवी दिल्ली:नीट पेपरफुटीसारख्या घोटाळ्याच्या संदर्भात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून येथील जंतर-मंतरवर आंदोलन करण्यात येणार आहे. आता सीजेपीने आज आपल्या तीन प्रवक्त्यांची नियुक्ती केली आहे.अभिजीत दिपके यांनी स्थापन केलेल्या या संघटनेने एक्स या समाजमाध्यमावर या नियुक्त्यांची घोषणा केली. या नुसार, सौरभ दास हे सीजेपीचे मुख्य प्रवक्ते म्हणून काम पाहतील. तर राजकीय संशोधक विजेता दहिया, तसेच आशुतोष रांका हे दोघेही जनतेसमोर आणि माध्यमांसमोर संघटनेची भूमिका मांडतील.

## जूनच्या सुरुवातीलाच सोनं महागलं!

मुंबई/प्रतिनिधी-आज देशात सोन्याच्या किमती वाढत आहेत. अमेरिका-इराणमधील तणाव आणि डॉलरमधील सततच्या चढ-उतारामुळे, गुंतवणूकदार सोन्याकडे एक सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहत आहेत. परिणामी, किमतींमध्येही वाढ दिसून येत आहे. कालच्या तुलनेत किमती ०.१४% नी वाढल्या आहेत. देशाच्या बहुतांश भागांमध्ये, २४-कॅरेट सोन्याचा भाव अंदाजे १,५६,३६० प्रति १० ग्रॅम आहे. तर, २२-कॅरेट सोन्याचा दर १,४३,३४० प्रति १० ग्रॅम आहे. त्याचप्रमाणे, १८-कॅरेट सोन्याचा भाव १,१७,३१० प्रति १० ग्रॅम आहे.

# प्रलंबित पीकविम्यासाठी शिवसेनेचा आक्रमक पवित्रा;नांदेडातील विमा कंपनी कार्यालयाला ठोकले टाळे

देगलूर/प्रतिनिधी-खरीप हंगामातील प्रलंबित पीकविमा रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवार दि.२ जून रोजी नांदेड येथील ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेडच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत कंपनीच्या कार्यालयाचे शटर बंद करून कुलूप ठोकले.

यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यासाठी सोयाबीनसह विविध पिकांसाठी एकूण ८८८.६७ कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला. त्यापैकी सुमारे ५०२ कोटी रुपयांचे वाटप झाले असले, तरी देगलूर तालुक्यातील सात मंडळांपैकी देगलूर, खानापूर आणि मरखेलसह काही मंडळांतील शेतकरी अद्यापही विमा रकमेपासून वंचित आहेत. शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी खते, बियाणे, कीटकनाशके आणि इतर कृषी साहित्य खरेदी करण्याची निकड असताना विमा रक्कम न मिळाल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. गेल्या काही वर्षांपासून सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आधीच कर्जबाजारी झाला असून, वाढलेल्या कृषी निविष्ठांच्या किमतींमुळे त्यांची अडचण अधिकच वाढली आहे. राज्य शासनाकडून सुमारे ३८५.११ कोटी रुपयांचा निधी अद्याप प्राप्त झाला नसल्याचे कारण देत विमा कंपनीकडून उर्वरित रक्कम वितरित करण्यात आलेली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, तात्काळ पीकविमा वाटप करण्याची मागणी जोर धरत आहे.या मागणीसाठी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी यापूर्वी उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार कार्यालयासमोर निदर्शने केली होती. मात्र त्यानंतरही विमा वाटप न झाल्याने पदाधिकाऱ्यांनी थेट नांदेड येथील विमा कंपनीचे कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी अधिकाऱ्यांनी शासनाकडून निधी प्राप्त होताच विमा वितरित करण्यात येईल, असे सांगितले. मात्र या उत्तराने समाधान न झाल्याने शिवसैनिकांनी कंपनीच्या कार्यालयाला कुलूप ठोकत निषेध नोंदविला. आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके-देगावकर, देगलूर शहरप्रमुख भगवान जाधव, युवासेना तालुका प्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, सचिन इबितवार तमलूरकर, अर्जुन लुटे अल्लापूरकर यांच्यासह अनेक शिवसैनिक सहभागी झाले होते. दरम्यान, राज्य शासनाने विमा कंपनीकडे अनुदानाची



रक्कम तात्काळ वर्ग करावी आणि उर्वरित शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम विलंब न लावता वितरित करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.




काँग्रेसच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी खा.रवींद्र चव्हाण व उत्तर जिल्हाध्यक्षपदी विठ्ठल पावडे तसेच शहराध्यक्षपदी अब्दुल गफार यांची नुकतीच निवड करण्यात आली. आज सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्यावतीने नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष व महानगराध्यक्षांचा शाल,भव्य पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी सिडको ब्लॉक अध्यक्ष बापूसाहेब पाटील व इतर काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तब्बल एका वर्षानंतर हदगाव पोलीस स्टेशनला नियमित पोलीस निरीक्षक

## परमेश्वर कदम यांनी स्वीकारला पदभार

हदगाव/प्रतिनिधी-गेल्या जवळपास वर्षभरापासून हदगाव पोलीस स्टेशनचा कारभार सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या माध्यमातून चालविला जात होता. त्यामुळे येथे नियमित पोलीस निरीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती. अखेर ही प्रतीक्षा संपुष्टात आली असून हदगाव पोलीस स्टेशनला नियमित पोलीस निरीक्षक लाभले आहेत.

वजीराबाद पोलीस ठाणे, नांदेड येथून बदली होऊन आलेले पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी मंगळवार, दि.२ जून रोजी हदगाव पोलीस स्टेशनच्या प्रमुखपदाचा पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे पोलीस प्रशासनासह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हदगाव पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्राचा विस्तार मोठा असून, मागील वर्षभरात अनेक गंभीर गुन्ह्यांच्या तपासासह कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सहाय्यक अधिकाऱ्यांवर होती. याशिवाय राजकीय घडामोडी, पोलीस व नागरिकांमधील समन्वय, तसेच अपुऱ्या मनुष्यबळाची समस्या यांसारखी अनेक आव्हाने पोलीस यंत्रणेसमोर आहेत. अशा परिस्थितीत नियमित पोलीस निरीक्षकाची नियुक्ती होणे ही हदगाव तालुक्यासाठी महत्त्वाची बाब मानली जात आहे. परमेश्वर कदम यांच्या अनुभवाचा लाभ पोलीस प्रशासनाला मिळणार असून कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हदगाव पोलीस स्टेशनला नियमित पोलीस निरीक्षक मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असले, तरी महिला पोलीस निरीक्षक नियुक्तीची मागणी अद्यापही प्रलंबित असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. नवनियुक्त पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या नेतृत्वाखाली गुन्हेगारी नियंत्रण, प्रलंबित गुन्ह्यांचा तपास आणि नागरिकाभिमुख पोलीस व्यवस्था अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा हदगावकरांकडून व्यक्त होत आहे.

# महायुतीची १७ जागांसाठी उमेदवारांची अधिकृत घोषणा

## बंडखोरांना महामंडळांवर संधीचे आमिष

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने आपल्या १७ अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली असून, सर्वच्या सर्व जागांवर विजय मिळवण्याचा ठाम विश्वास महायुतीचे नेते तथा मंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. आगामी १८ जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय हालचालींना वेग आला असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून असल्याने पक्षांतर्गत बंडखोरी रोखण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

मुंबई येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत रवींद्र चव्हाण यांनी महायुतीच्या उमेदवारांची घोषणा करताना घटक पक्षांमध्ये उत्तम समन्वय असल्याचे सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बहुसंख्य माजी लोकप्रतिनिधी महायुतीच्या पाठीशी असल्याने सर्व १७ जागांवर विजय निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला.दरम्यान, निवडणुकीपूर्वी काही मतदारसंघांमध्ये बंडखोरीचे संकेत दिसून आले होते. याबाबत बोलताना चव्हाण म्हणाले की, वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीमुळे तीन ठिकाणची बंडखोरी शमवण्यात यश आले आहे. अधिकृत उमेदवारांविरोधात अपक्ष किंवा बंडखोर म्हणून अर्ज दाखल केलेल्या नेत्यांनी अर्ज मागे घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.बंडखोरांना पक्षात कायम ठेवण्यासाठी महायुतीने पुनर्वसनाचा फॉर्म्युला पुढे केला आहे. पक्षाचा आदेश मानून निवडणुकीतून माघार घेणाऱ्या इच्छुक नेत्यांचा भविष्यात विविध शासकीय समित्या, महामंडळे तसेच अध्यक्ष वा सदस्यपदांसाठी सकारात्मक विचार केला जाईल, असे संकेत रवींद्र चव्हाण यांनी दिले.

महायुतीचे जिल्हानिहाय अधिकृत उमेदवार: वर्धा-चंद्रपूर-गडचिरोलीअरुण लखाणी, भंडारा-गोंदिया-अविनाश ब्राह्मंडकर, अमरावती-प्रवीण पोटे, सोलापूर-राजेंद्र राऊत, सांगली-सातारा-धैर्यशील कदम, अहिल्यानगर-प्राजक्त तनपुरे, छत्रपती संभाजीनगर-जालना-सुहास शिरसाट, नांदेड-अमर राजूरकर, धाराशिव-बीड-लातूर-बसवराज पाटील, जळगाव-नंदकिशोर महाजन, नागपूर-डॉ.राजीव पोतदार, ठाणे-रवींद्र फाटक, यवतमाळ-दृष्यंत चतुर्वेदी, परभणी-हिंगोली-सय्यद खान, नाशिक-नरेंद्र दराडे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग-अनिकेत तटकरे, पुणे-विक्रम काकडे. महायुतीच्या या घोषणेनंतर विधानपरिषद निवडणुकीची रंगत आणखी वाढली आहे. आता सर्वांचे लक्ष ४ जूनच्या अर्ज माघारीच्या अंतिम मुदतीकडे लागले असून, १८ जून रोजी होणाऱ्या मतदानातून या राजकीय समीकरणांचा निकाल लागणार आहे.

पान १ वरुन

### पश्चिम बंगालमध्ये...

आमदारांच्या गटाचे नेतृत्व करत असल्याची चर्चा आहे.या बंडखोर गटाने विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांची भेट घेत सह्यांचे पत्र सादर केले. या पत्रात ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ममता बॅनर्जी यांनाच विधानसभेच्या गटनेतेपदी कायम ठेवावे, अशी भूमिकाही या आमदारांनी मांडली आहे. या घडामोडींमुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, टीएमसीतील अंतर्गत संघर्ष पुढील काळात कोणते वळण घेतो याकडे राज्यासह देशाचे लक्ष लागले आहे.

### नांदेडमध्ये बंडखोर ठाम;...

वाढली आहे. काल चिखलीकरांच्या माघारीसाठी प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे प्रयत्न करीत असल्याचे वृत्त होते. परंतु आज मात्र माघारीसाठी कुठल्याही हालचाली दिसून आल्या नाहीत. उद्या (४ जून) उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत संपणार आहेत. त्यामुळे अंतिम मुदतीनंतर कोण माघार घेणार आणि कोण निवडणुकीच्या रिंगणात राहणार, याकडे नांदेडच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### शेतमाल व्यापारासाठी परवाना...

कलम ६ (२) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार कलम ५ (ड) अंतर्गत परवाना घेणे आवश्यक राहील; मात्र अशा परवानाधारकांकडून बाजार समितीला कोणतेही बाजार शुल्क आकारता येणार नाही.कायद्यातील कलम ५ (ड) नुसार थेट पणन, खाजगी बाजार शेतकरी-ग्राहक बाजार आणि ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म या प्रयोजनांसाठी परवाने देण्यात येतात.त्यामुळे शेतमाल व्यापार करणाऱ्या सर्व व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व अन्य संबंधित घटकांनी कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक परवाने घेऊनच व्यवसाय करावा. अन्यथा त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पणन संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

# महागाई विरोधात राष्ट्रवादीचा मुंबईत एल्गार

मुंबई/प्रतिनिधी-पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांसह महागाईच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने नवी मुंबईत बुधवारी जोरदार आंदोलन करण्यात आले. मात्र आंदोलकांना आंदोलनस्थळी जाण्यापासून पोलिसांनी रोखल्याने वातावरण तणावपूर्ण बनले. यावेळी पोलिस आणि आंदोलकांमध्ये शाब्दिक चकमकीसह धक्काबुक्की झाल्याने आंदोलनाला काही काळ तीव्र स्वरूप प्राप्त झाले.

नवी मुंबईतील नियोजित ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चूल मांडून तसेच भांडी वाजवत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदविला. वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलचे वाढलेले दर आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक अडचणी याकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जयंत पाटील, रोहित पवार, जितेंद्र आव्हाड, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, रोहिणी खडसे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर तीव्र टीका करण्यात आली.मोर्चा वाशी महामार्गाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करण्यात आला असता पोलिसांनी आंदोलकांना अडविले. यावेळी रस्ता रोको करण्याचाही प्रयत्न झाल्याचे सांगण्यात येत आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलक आणि पोलिसांमध्ये झालेल्या धक्काबुक्कीत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.मोर्चा पुढे नेण्याच्या प्रयत्नात खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह काही नेत्यांशी धक्काबुक्की झाल्याची माहिती समोर आली. त्यानंतर सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि जितेंद्र आव्हाड यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आंदोलनस्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना जयंत पाटील यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. पेट्रोल-डिझेलचे दर प्रचंड वाढले आहेत. एवढी महागाई यापूर्वी कधीच पाहायला मिळाली नव्हती. २०१४ मध्ये इंधनाचे दर कमी होतील, अशी आश्वासने देण्यात आली होती. मात्र आजची परिस्थिती सर्वांसमोर आहे. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे, असे ते म्हणाले.महागाई आणि इंधनदरवाढीच्या प्रश्नावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून नवी मुंबईतील आंदोलनामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. सरकारने तातडीने इंधनाचे दर कमी करून महागाईवर नियंत्रण आणावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४